मे.पवन हंस हेलीकॉप्टर्स लिमिटेड, मुंबई यांच्याकडून ई निविदा प्रक्रियेनुसार हेलीकॉप्टर भाडे तत्वावर घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : एनएएक्स ०११६/प्र.क्र.२२/विशा १ ब.
दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० जानेवारी, २०१६.

वाचा :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं (विकृ)/ पवनहंस/बिल/४०/२०१०-२०१४, दि. ०१.०७.२०१५.

प्रस्तावना :-

नक्षलग्रस्त भागात पोलीस दलाचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच जखमी व्यक्ती तसेच जवानांची ने-आण करणे, जखमी जवानांना त्वरीत वैद्यकीय सहाय्य पुरविणे तसेच जवानांना खाद्यसामुग्री पुरविणे, संशयित भागाची पाहणी करणे इ. साठी ई निविदा प्रक्रियेनुसार हेलिकॉप्टर भाड्याने घेण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं (विकृ)/पवनहंस/बिल/४०/२०१०-२०१४, दि. ०१.०७.२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नक्षलग्रस्त भागात पोलीस दलाचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच जखमी व्यक्ती तसेच जवानांची ने-आण करण्यासाठी पोलीस महासंचालक यांनी राबविलेल्या ई निविदा प्रक्रियेनुसार न्युनतम ठरलेल्या मे. पवनहंस लिमिटेड, मुंबई यांच्याकडून २ वर्षासाठी (निविदा सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार) हेलिकॉप्टर भाड्याने घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पुढील कार्यवाही करावी.

२. यासाठीचा खर्च मागणी क्र. "बी-१, २०५५ पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५ ०१६८) ५१ मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली करण्यात यावा.

३. मात्र, हेलिकॉप्टर भाडे करारासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध नसल्याने व ५१ मोटार वाहने या उद्दीष्टाखालील तरतुदीचा पोलीस दलाच्या मोटार वाहने, वाहनांचे सुटे भाग, बोटींची दुरुस्ती इ. उद्देशांसाठीही विनियोग होत असल्याने मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०८) नक्षलग्रस्त भागातील सुरक्षाविषयक खर्च योजनेतर / १०० टक्के केंद्र पुरस्कृत, ५०, इतर खर्च (२०५५०४८२) या लेखाशिर्षाखालीही केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा पोलीस महासंचालक यांनी प्रयत्न करावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारीक संदर्भ क्र. ५५९/१५/व्यय-७, दि. ०७.११.२०१५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१३०११४२३००३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb427 93fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2016.01.30 11:43:47 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद,
५) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा,
६) सर्व विधान परिषद / विधान सभा सदस्य,
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर,
१०) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर,
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२) आयुक्त, राज्य गुप्तावार्ता विभाग, मुंबई,
१३) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे,
१६) विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली,
१७) जिल्हाधिकारी, गडचिरोली / गोंदिया,
१८) पोलीस अधिक्षक, गडचिरोली / अहेरी / गोंदिया,
१९) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
२०) गृह विभागातील सर्व अधिकारी.
२१) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर,
२२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२३) निवडनस्ती (विशा-१ब)